महाराष्ट्र टाइम्स ■ बुधवार, १३ जानेवारी २०१६

# 'सहकार भारती'चे उल्लेखनीय योगदान

■ भालचंद्र कुलकर्णी

**'बिना संस्कार नहीं सहकार,' हे ब्रीद घेऊन या चळवळीसाठी एका ध्येयाने काम करणाऱ्या सहकार भारतीचा स्थापना दिन ११ जानेवारी रोजी झाला. सहकार भारतीच्या स्थापनादिनानिमित्ताने विशेष लेख**

राष्ट्र पुनर्निमाणाच्या प्रयत्नात सहकार क्षेत्राचे महत्त्व ओळखून सहकार चळवळीची गुणात्मक वाढ होण्यासाठी सहकार भारती गेली ३७ वर्षे सेवाभावी सहकारी कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. सहकार भारतीची स्थापना ११ जानेवारी १९७८ रोजी पुण्यात झाली. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, गुलाबराव पाटील, वसंतदादा पाटील आदींच्या सहकारातील योगदानाचे महत्त्व आपण जाणतोच. सहकार भारतीचे संस्थापक असलेले सांगलीचे अण्णासाहेब गोडबोले, साताऱ्याचे लक्ष्मणराव इनामदार, जळगावचे डॉ. अविनाश आचार्य, नागपूरचे वसंतराव देवपुजारी, नाशिकचे मधुकरराव कुलकर्णी आदींचे देखील सहकार चळवळीच्या वाटचालीत मोठे योगदान

## निमित्त

आहे. आज सहकार भारतीच्या देशव्यापी कार्यात असंख्य सुसंस्कारित कार्यकर्त्यांचा सहभाग आहे.

सहकार चळवळ पक्षीय राजकारणापासून अलिप्त असली पाहिजे, असाही सहकार भारतीचा आग्रह आहे. म्हणूनच संस्थेच्या आतापर्यंत झालेल्या अधिवेशनातून, परिसंवादातून विविध राजकीय नेत्यांनी सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांनी देखील आपले मत स्पष्टपणे नोंदवले आहे. शंकरराव चव्हाण, बाळासाहेब विखे-पाटील, शिवाजीराव पाटील, अण्णासाहेब शिंदे, गोपीनाथ मुंडे, मोहन धारिया, नितीन गडकरी, जयसिंग गायकवाड, पृथ्वीराज चव्हाण, नीलकंठ रथ, दत्तोपंत ठेंगडी, बाळासाहेब देवरस, रज्जूभैय्या, अण्णा हजारे आदींनी सहकार भारतीच्या व्यासपीठावरून मार्गदर्शन केले आहे. सहकार भारतीचे काम आता २३ राज्यात सुरू आहे.

सहकार भारतीच्या रौप्य महोत्सवानिमित्त डिसेंबर २००३ मध्ये मुंबईत पहिले राष्ट्रीय महाअधिवेशन झाले. या अधिवेशनास देशभरातून दहा हजाराहून अधिक कार्यकर्ते उपस्थित होते. २००६ मध्ये दुसरे अधिवेशन दिल्लीत झाले. तिसरे अधिवेशन २००९ मध्ये भोपाळ येथे तर चौथे २०१२ मध्ये बेंगळुरू येथे पार पडले. या अधिवेशनात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी मार्गदर्शन केले. पाचवे अधिवेशन नुकतेच अहमदाबाद येथे पार पडले. सहकार भारतीची राज्यातील सांगली, राहुरी, नागपूर, डोंबिवली, पुणे, जळगाव, आळंदी, औरंगाबाद, नाशिक अशी अनेक अधिवेशने मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाली. अण्णासाहेब गोडबोले यांच्या सहकारातील अद्वितीय कामाची आठवण राहावी, यासाठी त्यांच्या कुटुंबीयांनी सहकार भारतीला विशेष निधी दिला. त्यातून एका कार्यकर्त्याला पुरस्कार दिला जातो. तात्या इनामदार यांना मरणोत्तर तर वसंतराव देवपुजारी, डॉ. अविनाश आचार्य, मधुकरराव कुलकर्णी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांमुळे दक्षिण आफ्रिकेतील नामिबिया आणि बोटस्वाना येथे दोन सहकारी बँकांची स्थापना झाली आहे. २००४ पासून सहकार भारतीने प्रशिक्षणाची देखील चांगली व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. त्याला 'महाराष्ट्र राज्य सरकारने प्रशिक्षणाची शिखर संस्था म्हणून मान्यता दिली आहे. उदारीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये आर्थिक क्षेत्राला सहकारी चळवळच पर्याय आहे. त्याची पुनर्मांडणी करण्याची गरज आहे. परंतु आवश्यकता आहे ती सहकारी चळवळीतील कार्यकर्त्यांनी एकत्र येण्याची आणि सुसंस्कारित होण्याची.

**(लेखक 'सहकार सुगंध'चे संपादक असून सहकार भारतीचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख आहेत.)**